INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF
HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.828 (SJIF 2022)

# मराठ्यांच्या स्वातंत्र्य युध्दातील संताजी घोरपडेची कामगिरी

## (Santaji Ghorpade's Performance in the Maratha War of Independence)

**प्रा. डॉ. आर. ए. चव्हाण**
इतिहास विभाग
महिला महाविद्यालय, गेवराई, जि. बीड
E-mail: rchavan1972@gmail.com

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/05.2022-64531157/IRJHIS2205002**

**प्रस्तावना :**

मराठ्यांच्या इतिहासात इ.स. १६८९ ते १७०७ या १८ वर्षांच्या काळात मराठ्यांनी औरंगजेबांशी जो जबरदस्त लढा दिला तो लढा भारताच्या इतिहासात मराठ्यांचा स्वातंत्र्यसंग्राम म्हणून प्रसिध्द आहे. मोगल बादशहा औरंगजेबाच्या मृत्यूबरोबर हा लढा संपला या लढ्याचे अनेक चढ-उतार पाहिलेत; परंतु अंततः मराठ्यांच्या बाजुला विजयश्री उभी राहिली.

शेख निजाम उर्फ मुकर्रबखानने १ फेब्रुवारी १६८९ रोजी छत्रपती संभाजी महाराजांना संगमेश्वर येथे अटक केली. त्यांच्या बरोबर कवी कलशलाही अटक केली. दोघांचे अत्यंत हाल करण्यात आले. संभाजीचे डोळे काढण्यात आले, यमयातना देण्यात आल्या, पण त्या सिंहाच्या छाव्याने औरंगजेबापुढे झुकण्यास नकार दिला. शेवटी ११ मार्च १६८९ रोजी औरंगजेबाने वढु कोरेगांव येथे संभाजीला ठार मारले. संभाजीच्या धिरोदान मरणाने सारी मराठेशाही थरारून उठली. छत्रपतीपदी राजाराम हे १२ फेब्रुवारी १६८९ ते ०२ मार्च १७०० पर्यंत छत्रपती राहिले. त्यानंतर महाराणी ताराबाई ही शिवाजी महाराजांच्या शूर सेनापती हंबीरराव मोहित्यांची मुलगी राजारामाच्या मृत्यू नंतर पांढरे कपाळ घेऊन पती निधनाचे दुःख मिरविण्यासाठी ताराबाईचा जन्म झाला नव्हता. हंबीररावसारख्या महान पराक्रमी सरदाराची ही मुलगी अत्यंत चाणाक्ष, कर्तबगार आणि महत्वकांक्षी होती. पतिनिधनाचे दुःख बाजूला सारून तिने स्वतःचा ४ वर्षाचा पुत्र (शिवाजी दुसरा) याला छत्रपती म्हणून घोषित करून सर्व राज्य कारभार स्वतःच्या हाती घेतला. खाफीखान ताराबाईला "राज्यव्यवहार कुशल स्त्री" म्हणून उल्लेख करतो. ताराबाई औरंगजेबाशी समेट करण्याचा प्रयत्न केला, परंतु औरंगजेबाने मराठ्यांच्या सर्व किल्ल्यांचा आग्रह धरल्याने हा समेट होऊ शकला नाही. म्हणून ताराबाईला मोगलांविरूध्द मोहीम सुरू ठेवावी लागली. मराठ्यांच्या इतिहासात छत्रपती संभाजी महाराजांच्या वधानंतर संताजी घोरपडे, धनाजी जाधव आणि रामचंद्रपंत आमात्य या त्रिमुर्तीने मराठे शाहीला तारले[१].

**संताजी घोरपडे** (इ.स. १६८९ ते १६९७) : -

मराठ्यांच्या स्वातंत्र्यसंग्रामात ज्या रणविरांनी भीमपराक्रम गाजून मोगली फौजेच्या तोंडास फेस आणला. त्यात संताजी घोरपडे यांचे नांव आग्रक्रमी घ्यावे लागते. छत्रपती संभाजींच्या मृत्यूनंतर संताजी, धनाजी, रामचंद्रपंत, शंकरजी मल्हार, परशुराम, त्रिंबक प्रल्हाद आणि निराजी यांना सोबत घेऊन औरंगजेब बादशहाबरोबर युध्द केले. जदुनाथ सरकार म्हणतात "मराठ्यांची केंद्रिय सत्ता नव्हती तरी, इतर मराठे सरदार बादशहाच्या प्रदेशावर आक्रमण करून लुटू लागले.[२]" संताजी घोरपडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी शत्रुवर विजय मिळविण्यासाठी जो गनिमीकावा युध्द पध्दती स्विकारली होती तीच पध्दती यांनीही स्विकारली. राजाराम महाराज जिंजीस असता रामचंद्रपंत आमात्य व संताजी घोरपडे यांनी मोगलांविरूध्द चालविलेली लढाई कोकणातील कित्येक देसायांनी भाग घेतला होता. संभाजीच्या

कालखंडापासून मराठ्यांना फिरंग्यांचा राग होताच. त्यामुळे १५ नोव्हेंबर १६९४ च्या पूर्वी काही दिवस रावजी शामराव याची एक तुकडी बारदेशमध्ये घुसली व तेथील लोकांकडून त्यांनी माणसी ३ रूपये पट्टी शक्तीने वसूल केली[3].

छत्रपती राजारामाच्या मृत्युनंतर सर्व राज्य कारभाराची सुत्रे महाराणी ताराबाईनी आपल्या हाती घेतली. मराठा सैन्यातील शूर सरदार संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांच्या साथीने औरंगजेबाच्या मोगल सैन्याला सतत हुलकावनी दिली[4]. औरंगजेब बादशहाने संभाजी महाराजांच्या केलेल्या वधाचा बदला संताजी आणि धनाजीने घेतला. असदखान झुल्फिकारखान आणि कामबक्ष यांनी जिंजीचा वेढा आवळताच प्रथम धनाजी व त्यानंतर संताजी हे राजाराम महाराजांच्या मदतीस निघाले. संताजीला कांचीचा मोगल फौजदार अलिमर्दानखानाने कावेरीपाक किल्ल्याजवळ आडविले, पण संताजी त्याच्यावर इतक्या त्वेषाने तुटून पडले की, त्याला पळता भूई थोडी झ ाली. संताजीने अलिमर्दखानाला कैद केले. कर्नाटकचा फौजदार कासिमखान हा मोठ्या तयारीनिशी मराठ्यांचा बंदोबस्त करण्यासाठी जिंजीकडे निघाला असता कांचीजवळ संताजीने त्याला चोप दिला त्यामुळे त्याला माघारी फिरावे लागले.

इ.स. १६९३ च्या शेवटी संताजी कर्नाटकातून स्वराज्यात आला तेव्हा त्याला आडविण्यासाठी औरंगजेब बादशहाने हिंमतखान या सेनानीची रवानगी केली. मार्च १६९४ मध्ये संताजीने हिंमतखानाचा पराभव केला. संताजी वेल्लोरकडे जात असतांना कर्नाटकचा फौजदार कासिमखानाने संताजीला आडवले तेव्हा संताजीने मोगली फौजेला मागे रेटत दोड्डेरीच्या गढीत कोंडले. कासिमखान व त्याची मोगली फौज दोड्डेरीच्या गढीत आडकून पडली. बाह्य जगाशी त्यांचा संपर्क तुटला. अन्न-धान्य व पाण्याविना गढीतील मोगली फौज व जनावरे बेहाल होऊन पटापटा मरू लागली. कासिमखान गढीतच मरण पावला[5]. कासिमखानची दुर्दशा केल्यानंतर संताजीने बसवापट्टण येथील हिम्मतखानाच्या छावणीवर हल्ला केला. इ.स. १६९६ मध्ये हिंमतखानला ठार मारले. त्याठिकाणी संताजीला प्रचंड लूट मिळाली. दिड्डेरीच्या पाठोपाठ एक महिन्याच्या आत संताजीला मिळालेला हा दुसरा विजय होता. त्याच्या आयुष्यातील हा शेवटचा विजय होय[6].

**संताजी घोरपडे आणि छत्रपती राजाराम भेट : -**

अतुलनीय पराक्रम गाजवून, नेत्रदिपक विजय मिळवून संताजी जिंजीला राजारामाच्या भेटीला गेले. परंतु तेथे काही कारणावरून संताजी व राजारामाचे बिनसल्याने संताजीला त्यांनी सेनापती पदावरून काढून टाकले. त्यांच्या जागी धनाजी जाधव यांना सेनापतीपदी नियुक्त केले. अत्यंत निराश अवस्थेत संताजी महाराष्ट्रात आला. संताजी व धनाजी या मराठेशाहीतील जोड गोळीत सख्य कधीच नव्हते. या घटनेचा धनाजीला सतत हेवा वाटत असे. यामुळे दोघांमध्ये सतत धुमसत असलेल्या आगीने अचानक पेट घेतला. संताजीच्या हाताखालील अनेक मराठे सैनिक धनाजीला जाऊन मिळू लागले. त्यामुळे संताजीचा पक्ष दिवसेंदिवस दुबळा होऊ लागला.

**संताजी व धनाजी मधील यादवी : -**

मराठ्यांच्या इतिहासात या जोडीने मोगल बादशहाच्या छावणीचे चांदीचे कळस कापून आणण्याचा पराक्रम केला होता. त्यांच्यात सत्तेसाठी संघर्ष झाला. दोघांमध्ये लहानमोठ्या लढायाही झाल्या. त्यात संताजीचा पराभव झाला. अशाच एका लढाईत अमृतराव निंबाळकर हा संताजीकडून मारला गेला. धनाजीकडून पराभूत झालेला संताजी अतिशय खिन्नस्क अवस्थेत रानोमाळ भटकू लागले. निंबाळकर हा नागोजी मानेचा मेहुणा होता. नागोजी आपल्या मेहुण्याच्या वधाचा सूड घेण्यासाठी संताजीच्या पाठीवर होता. जून १६९७ मध्ये एक दिवशी ओढ्यावर आंघोळ करीत असतांना त्याच्या पाठलागावर असलेला नागोजी माने तेथे पोहचला आणि बेसावध संताजीचा त्याने वध केला[7]. मराठ्यांच्या इतिहासात एका पराक्रमी जिवाचा अत्यंत दुर्दैवी मृत्यु झाला. नागोजी मानेनी संताजीचे शिर कापून मोगल बादशहाकडे पाठविले. डॉ. ब्रिजकिशोर म्हणतात "मराठे शाहीच्या दृष्टीने पराक्रमी संताजीच्या दुर्दैवी मृत्युने प्रचंड आघात तर मोगलांच्या दृष्टीने आनंदोत्सवाचा प्रसंग होता."

मोगल सैन्य घोड्यांना पाणी पाजत असतांना विचारत असत, "तुम्हाला पाणी पित असतांना पाण्यामध्ये संताजी आणि धनाजी दिसतात का?" या सेनापतीने मराठ्यांच्या इतिहासात मोलाची कामगिरी पार पाडली.

**निष्कर्ष : -**

१) मराठ्यांच्या स्वातंत्र्यसंग्रामामध्ये संताजीने छत्रपती शिवाजी महाराजाने शत्रुस पराभूत करण्यासाठी गनिमी कावा युध्दपध्दतीचा

स्वीकार केला. तीच पध्दत संताजींनी राबविली.

२) औरंगजेबाने संभाजीचा वध केला, त्याचा बदला म्हणून संताजीने आणि धनाजीने त्यांच्या छावणीचा चांदीचा कळस कापून आणला.

**सारांश : -**

औरंगजेब बादशहाने दक्षिणेची मोहीम मराठेशाही, आदिलशाही आणि कुतुबशाही नष्ट करण्याचे तिरंगी स्वप्न उराशी बाळगुन औरंगजेब इ.स. १६८२ मध्ये दक्षिणेत उतरला. या स्वप्नाचे दोन पदर उकलन्यात बादशहाला यश आले, परंतु तिसरा पदर उकलन्यात तो असफल ठरला कारण महाराणी ताराबाईने सात वर्षाच्या कालखंडात संताजी, धनाजी व रामचंद्रपंत आमात्यासारख्या सेनापतींना सोबत घेऊन बादशहाची निद्रा हराम केली म्हणून अपुरे स्वप्न पाहण्यासाठी स्वप्नाचा तिसरा पदर उकलन्यासाठी औरंगजेब बादशहा २० फेब्रुवारी १७०७ मध्ये चिरनिद्रेच्या आधिन झाले[८]. मोगली प्रतिष्ठा धुळीस मिळविणारी आणि मराठ्यांची अस्मिता असीम तेजाने प्रगट करणारी महाराणी ताराबाई मराठ्यांच्या इतिहासात पडलेले एक सुंदर स्वप्न होय.

**संदर्भ सूची : -**


१) कुंटे भ.ग. (भाषांतर), औरंगजेबाचा इतिहास, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृतीक मंडळ, मुंबई १९७८, पृ.क्र. ७०४.

२) कुमार अमित, मराठों का इतिहास, डिस्कवरी पब्लिसिंग हाऊस प्राइवेट लिमिटेड, नई दिल्ली प्रथम संस्करण २०१०, पृ.क्र. १३

३) केळकर ना.चि. स्मारक व्याख्यानमाला, पोर्तूगीज मराठे संबंध मे १९६७ पृ.क्र. १३०

४) विकिपिडीआ - ताराबाई भोसले दि. १३/०४/२०१७ पृ.क्र. २

५) कुंटे भ.ग. (भाषांतर), उपरोक्त पृ.क्र. ७१४

६) मदन मार्डीकर मराठ्यांचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर, औरंगाबाद, जून - २००८, पृ.क्र. २०१

७) कित्ता, पृ.क्र. २०२

८) कुंटे भ.ग. (भाषांतर), उपरोक्त पृ.क्र. ८१०


IRJHIS